# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९/११९०
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/१४२

दिनांक – २१/२/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार अपंग व्यक्तींना शासकीय/निमशासकीय सेवेत आरक्षण देऊन विशेष मोहिमेद्वारे पदे भरणेबाबत.

संदर्भ – शासन निर्णय क्र.न्यायाप्र–२०११/प्र.क्र.९१/सुधार–३, दि. ८ ऑगस्ट २०११
शासन निर्णय क्र.न्यायाप्र–२०११/प्र.क्र.१२९/सुधार–३, दि. ४ ऑगस्ट, २०११.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक असून अपंगांसाठी आरक्षित असलेली पदे तसेच अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत असून शासन आदेशानुसार अपंग अनुशेषाची पदे भरुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत – वरीलप्रमाणे

21/2/2012
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार
अपंग व्यक्तीना शासकीय / निमशासकीय सेवेत
आरक्षण देऊन विशेष मोहिमेव्दारे पदे भरणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. ९१ / सुधार -३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ८ ऑगस्ट, २०११.

वाचा:- १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/ ९९/१६-अ, दि.४ मार्च,२००२
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३ / (भाग-३)/१६-अ, दि. १९ ऑक्टोबर ,२००७
४) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र -०६/ प्र.क्र. ९ / सुधार -३, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.
५) शासन निर्णय क्रमांक :- अपंग- २०१०/ प्र.क्र. १९४ / सुधार -३ दिनांक :- १७ मार्च, २०११.
६) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. ४ / सुधार -३, दिनांक :- २७ एप्रिल, २०११.
७) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. १२९/ सुधार -३, दि.४ ऑगस्ट, २०११

परिपत्रक :-

अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे सुनिश्चित करुन ती भरणे आवश्यक आहे. अपंगांसाठी आरक्षित असलेली तसेच अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही वास्तविकत: जनहित याचिका क्र.३२९४/२०१० व इतर यावर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३० जून,२०११ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते. याबाबत या विभागाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करुन सूचना दिलेल्या आहेत तरीही अपंगांची संपूर्ण पदभरती झालेली नाही. या न्यायालयीन प्रकरणावर मा. उच्च न्यायालयाने दि.५ ऑगस्ट,२०११ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी नाराजी व्यक्त केलेली आहे. आणि अपंग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या पदांवर विशेष भरती मोहिम राबवून दि. ३० सप्टेंबर,२०११ पर्यंत अपंग व्यक्तींसाठी आरक्षित असलेली सर्व पदे भरण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

२. मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेऊन अपंगांसाठी आरक्षित असलेली अनुशेषाची रिक्त पदे विशेष भरती मोहिमे अंतर्गत भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम विभागांनी राबवावा.

i) अपंगांसाठी आरक्षित असलेल्या अनुशेषाच्या पदांवर भरतीसाठी जाहिराती दि. १५ ऑगस्ट, २०११ पर्यंत

iii) पदांवर नियुक्तीसाठी मुलाखती घेणे व निवड प्रक्रिया दि.२५ सप्टेंबर,२०११ पर्यंत पूर्ण करावी.
iv) निवड झालेल्या सर्व उमेदवारांना नियुक्तीचे आदेश दि.३० सप्टेंबर,२०११ पर्यंत देण्यात यावेत.

३. वरील प्रमाणे कार्यवाही करताना संदर्भाधीन वाचा मधील अनु.३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१९ ऑक्टोबर,२००७ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अपंगांसाठीचे आरक्षण हे सामाजिक आरक्षण नाही ही बाब विभागांनी विशेषत्वाने विचारात घ्यावी.

४. संवर्ग संख्येवर अपंगांच्या आरक्षणासाठी पदे निश्चित करताना संदर्भाधीन वाचा मधील अनु.७ येथील दि.४ ऑगस्ट,२०११ च्या परिपत्रकातील तरतुदी देखील विचारात घेण्यात याव्यात.

सर्व मंत्रालयीन विभागांनी हे आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुख, कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावेत आणि अपंगांसाठी आरक्षित असलेल्या अनुशेषाच्या पदांवर विहित कालावधीत पदभरती करण्यात यावी.

सदरहू शासन परिपत्रक शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. 201108091544436001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( रत्नाकर गायकवाड )
मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति :-
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग,हुतात्मा चौक,मुंबई (पत्राने )
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, समाजकल्याण अधिकारी,गट अ जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती-सुधार-३.

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासकीय / निमशासकीय सेवेत आरक्षण देऊन पदे भरणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. १२९/ सुधार -३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ४ ऑगस्ट, २०११.

वाचा:-
१) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दि.४ मार्च,२००२
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३ / (भाग-३)/१६-अ, दि. १९ ऑक्टोबर ,२००७
४) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र -०६/ प्र.क्र. ९ / सुधार -३, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.
५) शासन निर्णय क्रमांक :- अपंग- २०१०/ प्र.क्र. १९४ / सुधार -३ दिनांक :- १७ मार्च, २०११.
६) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. ४ / सुधार -३, दिनांक :- २७ एप्रिल, २०११.

परिपत्रक :-

अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे सुनिश्चित करुन ती भरणे आवश्यक आहे. वरील संदर्भाधीन अनुक्रमांक २ येथील शासन परिपत्रकाव्दारे सामान्य प्रशासन विभागाने शासन सेवेतील गट "अ " ते गट " ड " मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात क्रमवार बिंदू नामावली व कार्यपध्दती विहित केलेली आहे. वरील अनुक्रमांक ४,५ व ६ अन्वये अपंग व्यक्तींसाठी लागू करण्यात आलेले ३% आरक्षण पदभरती करताना संवर्ग संख्येला लावण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच अपंग व्यक्तींसाठी वरील शासन निर्णय दि.१७ मार्च ,२०११ अन्वये पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. पदे सुनिश्चित करण्यात आलेल्या एखादया संवर्गामध्ये पदसंख्या ३३ पेक्षा कमी असेल अशा वेळी ३% प्रमाणे अपंगांसाठी पद राखून ठेवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

आता अपंग व्यक्तींसाठी सुनिश्चित केलेल्या संवर्गनिहाय मंजूर पदांमध्ये ३ % पदांवर अपंगांसाठी आरक्षण ठेवताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना या परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत:-

| संवर्गातील मंजूर पदसंख्या | अपंगांकरिता राखीव पदे |
|---|---|
| १-७ | निरंक |
| ८-३३ | १ पद |
| ३३ पेक्षा जास्त | ३ टक्के आरक्षणानुसार पूर्ण एककात येणारी पदे आणि त्यापुढील अपूर्णांक ०.५ अथवा त्यापेक्षा जास्त असेल तर त्याकरीता १ अतिरिक्त पद गृहीत धरावे. |

३. सदर परिपत्रकातील सूचना संबंधित मंत्रालयीन विभागाने आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, अनुदान प्राप्त संस्था यांच्या निदर्शनास आणाव्यात.

४. हे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११७/१६-अ, दि. २७/७/२०११ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन परिपत्रक शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. २०११०८०३१२४९४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( दिनेश वाघमारे )
सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति :-

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग,हुतात्मा चौक,मुंबई (पत्राने )
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, समाजकल्याण अधिकारी,गट अ जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती-सुधार-३.

------

एच-१४२७-१अ.